# HAND BOOK ON NOMINATION SOFTWARE

## for Returning Officers

**YEAR 2021-22**


**SECM**

अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | २-३ |
| १ | संगणक प्रणाली- पुर्व तयारी | ४ |
| २ | संगणक प्रणाली - Masters & Basics | ५-१३ |
| ३ | नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र-उमेदवाराने भरणे | १४-३६ |
| ४ | नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र -निवडणुक निर्णय अधिकाऱ्याने भरणे | ३७ |
| ५ | नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र -निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करून घेणे | ३८-४३ |
| ६ | नामनिर्देशन पत्र -छाननी करणे | ४४-४७ |
| ७ | उमेदवारी माघे घेणे | ४८-४९ |
| ८ | चिन्ह वाटप | ५०-५१ |
| ९ | उमेदवार बिनविरोध जाहिर करणे | ५२-५३ |
| १० | मतदान केंद्र मास्टरस भरणे | ५४-५५ |
| ११ | मतदानाची आकडेवारी भरणे विषयी | ५६-५८ |
| १२ | मतमोजणी व प्रमाणपत्र देणे | ५९-६३ |
| १३ | निवडणूक निकाल पहाणे | ६४-६७ |

## निवडणुक विषयक कायदे व तरतुदी :


स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागु कायद्यातील महत्वाच्या तरतुदी, तसेच सर्व महत्वाच्या आदेशांचे एकत्र संकलन असलेली संचयीका, महत्वाचे न्यायालयीन आदेश संचीका अशी सर्व माहिती आयोगाच्या वेबसाईटवर (https://mahasec.maharashtra.gov.in/)




**'निवडणुक निर्णय अधिकारी, उमेदवार इत्यादींसाठी मदतकक्ष( Help for ROs, Candidates etc.)'** या मेनुवर देण्यात आलेली आहे. तरी सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सदर संचिकां डाउनलोड करून अभ्यासणे आवश्यक आहे. तसेच काही मुद्दयांवर शंका असल्यास आपल्या जिल्ह्याच्या वा संस्थेच्या नोडल ऑफिसर मार्फत आयोगाशी संपर्क साधुन वेळीच शंकांचे समाधान करावे.

**२. निवडणुक प्रक्रियेच्या संगणकिकरण विषयक-** आयोगाने सन २०१५ पासुन 'नामनिर्देशनपत्र भरणे ते निवडणुक निकाल जाहिर करणे' या प्रकियेसाठी एक संगणकप्रणाली विकसीत केली आहे. सदर प्रणालीची लिंक (https://panchayatelection.maharashtra.gov.in/) ही आयोगाच्या वेबसाईटवर **'Online Nomination**

Form' या मेनुवर  पाहु शकता तसेच त्याबाबत उमेदवारांना देखील मार्गदर्शन करू शकता.




निवडणुक प्रक्रियेचे संगणकीकरण करण्याचा मुळ उद्देश हा प्रभावी रिपोर्टिंग व नियंत्रण आहे. असे असले तरी कायद्यातील तरतुदींना अनुसरून सर्व निवडणूक प्रक्रिया नियमानुसार पार पडणे आवश्यक आहे. उदा.  नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र संगणक प्रणालीतुन भरले नंतर ते साक्षांकीत करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना हाती आणुन देणे आवश्यक आहे.

मात्र, संगणकप्रकिया हे आयोगाला तसेच उमेदवारांसह सर्वांना तात्काळ माहिती सादर करण्याचे प्रभावी माध्यम असल्याने आपण पार पाडत असलेल्या प्रत्येक टप्प्याचे संगणकीकरण आवश्यक आहे यासाठी आवश्यक यंत्रणा उभारणे, आवश्यकतेनुसार त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

प्रकरण-१

## संगणक प्रणाली- पुर्व तयारी

१.१ **पुर्व तयारी** - प्रभाग रचना पुर्ण झालेनंतर, संबधित स्थानिक संस्थेच्या मुदतसमाप्तापुर्वी किमान दिड ते २ महिने अगोदर आयोगाकडून मतदार यादी कार्यक्रम देणेत येईल.

i) सदर मतदारयादी कार्यक्रमानुसार, भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मतदार यादीचे जर संगणकप्रणालीद्वारे विभाजन करावयाचे असेल तर त्यासाठी तसेच तदनंतर होणाऱ्या निवडणूक प्रकियेसाठी विश्वासु तसेच संगणक प्रणालीचे ज्ञान असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित कराव्यात.

ii) निवडणूक प्रकियेसाठी, आपल्या स्थानिक संस्थेच्या, प्रभागाच्या संख्येनुसार, प्रत्येक प्रभागाला किमान २-३ (अपेक्षीत उमेदवारांच्या संख्येनुसार यात वाढ करण्यास हरकत नाही) २४*७ उपलब्ध असणारे **Help Desk** उभारावयाचे आहेत सबब त्यासाठी मास्टर ट्रेनर तयार करावेत.

iii) तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशन पत्रांवरील पुढिल कारवाईसाठी प्रत्येक २-३ वार्डसाठी किमान १-२ ऑपरेटर नेमावेत.

iv) अंतीम प्रभाग रचनेनुसार प्रत्येक प्रभागाचे आरक्षण स्पष्ट दर्शवणारा तक्ता ऑफीस मध्ये दर्शनीभागी तसेच Help Desk कक्षात ठेवावा जेणेकरून चुकिच्या आरक्षणावर नामनिर्देशनपत्र भरली जाणार नाहित. Ward Master मध्ये भरण्यात आलेले आरक्षण योग्य असल्याची देखील खात्री करावी.


v) संगणक प्रणालीसाठी **High Speed Network** तसेच अखंडीत विजपुरवठ्याची गरज लागणार आहे सबब त्यासाठी आपल्या कार्यालयात तसेच Help Desk मध्ये तयारी करावी.

## प्रकरण-२

## संगणक प्रणाली - Masters & Basics


### २.१- लॉगइन करणे-

आयोगाकडून जिल्हापरीषदांसाठी जिल्हास्तरावर तर महानगरपालीकांसाठी - नगरपालीकांसाठी स्थानीक स्वराज्य संस्थेच्या स्तरावर देण्यात आलेल्या Userid -Password चा उपयोग करून https://panchayatelection.maharashtra.gov.in/) या लिंकवर लॉगइन करावे. लॉगइन केलेवर पुढिल स्क्रिन उपलब्ध होईल.




आपल्याला आवश्यक स्था.स्व.सं. Icon वर टॅब करावे

## २.२- मास्टरस भरणे




आपणास उपरोक्त स्क्रीन शॉटमध्ये दिलेनुसार ३  मास्टरस भरावयाचे आहेत. १) Electoral Division/ Ward Masters २) RO Masters ३) ARO Masters


### २.२.१ – Electoral Division/ Ward Masters भरणे–

RO व् ARO Masters मध्ये प्रत्येक RO ला प्रभाग द्यावा (assign करावा) लागत असल्याने प्रथम प्रभागाची माहिती भरणे आवश्यक आहे. सदर माहिती आपण १-१ करून भरू शकतो किंवा EXCEL मध्ये माहिती भरून Upload करू शकतो.

Ward Master/Electoral Division Masters वर टॅब केलेवर पुढिल प्रमाणे माहिती भरणे आवश्यक राहिल.

**सदर माहिती भरताना होणाऱ्या चुका टाळण्याकरिता अंतीम प्रभाग रचनेनुसार प्रत्येक प्रभागाचे आरक्षण स्पष्ट दर्शवणारा तक्ता/गॅझेट हाती ठेवुन जबाबदार व्यक्तीच्या देखरेखीखाली सदर काम पुर्ण करावे.**

खालील स्क्रीन शॉर्टमध्ये दर्शविल्याप्रमाणे Total Numbers of Electoral Division/Wards म्हणजे आपल्या स्था.स्व.सं. मध्ये असणारे एकुण प्रभागांची संख्या.





तसेच प्रभागाचा क्रमांक, प्रभागाचे नाव व आरक्षण भरणे आवश्यक आहे.

****प्रभागाचा क्रमांक, प्रभागाचे नाव व आरक्षण हे अत्यंत काळजीपुर्वक व अंतिम प्रभाग रचनेच्या प्रसिदध अधिसुचनेप्रमाणेच असल्याची खात्री करावी.** सदर आरक्षण विषयक माहिती चुकल्यास न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२.२.२ – Electoral Division/ Ward Masters Excel Upload करणे–

महानगरपालीका /जिल्हापरिषद वै. मोठया स्था.स्व.सं. मध्ये प्रभागांची संख्या पुष्कळ असल्याने Ward Masters Excel Upload सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे,




i) त्याकरिता असणारे टेंम्पलेट(Templet) डाउनलोड करून घ्यावे.


| Electoral_Division_Number | Name_of_Electoral_Division | Reservation_Category | Election_type |
|---|---|---|---|

ii) सदर तक्तयातील माहिती कशी भरावी या बाबतच्या स्वयं स्पष्ट सुचना सदर पृष्ठावर देण्यात आलेली आहे. सदर सुचना काटेकोरपणे पाळाव्यात अन्यथा EXCEL अपलोड करता येणार नाही. उदा. General Election असल्यास G, Bye Election असल्यास B लिहीणे आवश्यक आहे. आरक्षण कसे लिहावे हेही तपासावे.


वरील तक्तयातील माहिती खालीलप्रमाणे जि.प. साठी भरता येइल.

| Electoral_Division_Number | Name_of_Electoral_Division | Reservation_Category | Election_type |
|---|---|---|---|
| 1 | Gondia East | S.C.(W) | G |
| 2 | Gondia West | S.T. | G |
| 3 | Gondia North | B.C.C. | G |
| 4 | Gondia South | GEN(W) | G |

iii) Excel Uploading, Validate & Save




Excel Upload केलेनंतर सदर 'Upload/ Validate' या पर्यायावर क्लीक करावे. जर खालील स्क्रीन शॉर्टमध्ये दर्शवल्याप्रमाणे सदर EXCEL Valid असेल तर Done असा msg प्राप्त होईल. तदनंतर न विसरता Save ह्या पर्यायावर क्लीककरावे, सदर माहिती सेव्ह करणे अत्यंत आवश्यक आहे.





*** **महत्वाची सुचना- एकदा नामनिर्देशनपत्र भरणे सुरू झालेनंतर** Electoral Division/ Ward Masters Excel Upload **करता येत नाही सबब मुदतपुर्व** Excel Upload **करावी.**


२.२.३ RO/ARO Masters भरणे–

Ward Masters भरलेनंतर तात्काळ RO/ARO Masters भरणे आवश्यक आहे. येथे देखील आपण सदर माहिती १–१ करून भरू शकता किंवा EXCEL मध्ये माहिती भरून Upload करू शकता.

RO Masters Tab वर click केलेनंतर खालील स्क्रीन उघडेल.





ADD या पर्यायावर क्लीक केलेनंतर खालील स्क्रीन उघडेल




यामधील माहिती व्यवस्थीत भरावी. व माहिती भरलेनंतर ADD व Submit करणे आवश्यक आहे.


एकापेक्षा अधिक प्रभागांकरीता एकच निवडणूक निर्णय अधिकारी असल्यास तुम्ही फक्त प्रभाग क्रमांक बदलुन सदर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सदर प्रभाग Assign करू शकता.

माहिती भरल्यानंतर आपण **Submit** करावी, योग्यरित्या माहिती भरलेवर पुढिलप्रमाणे Msg. येईल.




२.२.४ Excel Upload RO/ARO-


i) Excel Upload पर्यायावर क्लीक केलेनंतर खालील विंडो ओपन होईल.



ii) येथील Template या पर्यायावर क्लीक केलेनंतर खालील Template प्राप्त होईल

| Surname | First_Name | Parent_Husband_Name | Mobile_Number | Email_ID | Electrol_Division_Number | Electrol_Division_Name |
|---|---|---|---|---|---|---|


सदर Template मध्ये योग्यरित्या माहिती भरावी. माहिती भरताना Template मध्ये कोणताही बदल करू नये, म्हणजेच त्यामध्ये कोणताही रकाना एकत्र वा वगळणी (merge or delete) करू नये.




दिलेल्या Template मधील माहिती भरल्यानंतर ती Template Upload करावी. सदर फाईल ही .xls (Excel format) असणे आवश्यक आहे. माहिती साधारण खालील प्रमाणे असेल.

| Surname | First_Name | Parent_Husband_Name | Mobile_Number | Email_ID | Electrol_Division_Number | Electrol_Division_Name |
|---|---|---|---|---|---|---|
| Pandit | Piu | S | 9874563212 | p.priya@gmail.com | 1 | Gondia East |
| Pandit | Piu | S | 9874563212 | p.priya@gmail.com | 2 | Gondia West |
| Pandit | Piu | S | 9874563212 | p.priya@gmail.com | 3 | Gondia North |
| Pandit | Piu | S | 9874563212 | p.priya@gmail.com | 4 | Gondia South |

iii) Excel योग्यरित्या Upload झालेनंतर खालील प्रमाणे Done असा message प्राप्त होईल. तदनंतर न विसरता Save ह्या पर्यायावर क्लीक करावे, सदर माहिती सेव्ह करणे अत्यंत आवश्यक आहे.




प्रकरण-३

## नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र -उमेदवाराने भरणे

**३.१ नामनिर्देशनपत्र भरण्याची सुविधा-** आयोगाने जाहिर केलेल्या कार्यक्रमानुसार उमेदवारांना २४*७ तास नामनिर्देशनपत्र भरण्याची सुविधा देण्यात येते. उमेदवारांनी भरलेले नामनिर्देशनपत्र व प्रतिज्ञापत्र उमेदवार स्वत: वा सुचकामार्फत विहित मुदतीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास आणून देईल.


३.१.१ **https://panchayatelection.maharashtra.gov.in/** या URL वर लॉगइन केलेनंतर खालील प्रमाणे Screen उपलब्ध होईल.





* Create Candidate Registration For- उमेदवाराने येथे Login करून स्वत:चे रजिश्ट्रेशन करणे आवश्यक आहे. **एका रजिश्ट्रेशन नंबर मधून उमेदवार ४ नामनिर्देशनपत्र भरू शकतात.** याबाबतची माहिती उमेदवारांना द्यावी, जेणेकरून नामनिर्देशनपत्र भरताना चुक झाल्यास तो दुसरे नामनिर्देशनपत्र भरु शकतो.

** Affidavit by the final contesting candidate- उमेदवार उपरोक्त लॉगइन मधून नामनिर्देशनपत्रासोबत प्रतिज्ञापत्र देखील दाखल करू शकतात. अंतिम निडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची प्रतिज्ञापत्र 'Affidavit by the final contesting candidate ' या मेनुवर पहाता येतात, सबब शक्यतोवर उमेदवार स्वत: ऑनलाईन नामनिर्देशनपत्र व प्रतिज्ञापत्र भरतील यावर भर देणे आवश्यक आहे.


३.१.२ नामनिर्देशनपत्र भरणेसाठी रजिश्ट्रेशन करणे- Create Candidate Registration For वर क्लीक केल्यावर खालील विंडो ओपन होईल




आपल्याला आवश्यक स्थानिक स्वराज्य संस्थेवर क्लीक केल्यावर खालील विंडो ओपन होईल





उमेदवार वरील प्राप्त चौकोनात आवश्यक विभाग, जिल्हा, व स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव सिलेक्ट करून Process करून मुख्य पृष्ठावर जाईल किंवा Cancel करून मुख्य पृष्ठावर जाईल.





उपरोक्त फॉम वरील माहिती भरुन  उमेदवार स्वत: करिता Userid Password तयार करेल व  तो नोंदवून ठेवेल. कारण या लॉगइनमधून ४ नामनिर्देशनपत्र व प्रतिज्ञापत्र दाखल करु शकतात.


**३.१.३ नामनिर्देशनपत्र भरणे–** उमेदवाराने तयार केलेल्या लॉगइन द्वारे उमेदवार नामनिर्देशनपत्र भरणेकरिता मुखपृष्ठावर जावु शकतो तेथे त्यास पुढिल विंडो प्राप्त होईल.




यातील नामनिर्देशनपत्रावर लॉगइन केल्यावर पुढिल विंडो येईल.





वरील मजकुर मान्य करून उमेदवार OK याबटनावर क्लिक करतो त्यावेळी Nomination Form/नामनिर्देशनपत्र प्राप्त होईल. त्यापैकी प्रथम भाग हा Auto-Filled येतो जो तुम्ही **Candidate Registration** वेळी भरला असतो. **उमेदवार मराठी-इंग्लीश कोणत्याही भाषेत नामनिर्देशनपत्राबाबतची माहिती भरू शकतो.**



ii) Candidate Details मध्ये उमेदवाराची वैयक्तीक माहिती देणे अपेक्षीत असुन यामध्ये भरलेली काही माहिती प्रतिज्ञापत्रात Auto-fill होत असते सबब सदर माहिती योग्यरित्या भरणे आवश्यक आहे.



iii)उमेदवार, सुचकाच्या मतदार यादीतील क्रमांकाची माहिती देणे तसेच तो एखाद्या पक्षाचा उमेदवार आहे वा कसे? तसेच तो निवडणूकीस उभे रहाण्यासाठी पात्र आहे याबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे




येथे उमेदवारास पक्षाची खात्री नसेल तर वा २-३ पक्षाची उमेदवारी मिळण्याची अपेक्षा असेल तर तो एकाच लॉगइन मधून एकापेक्षा अधिक फॉम भरू शकतो.

**३.१.४ प्रतिज्ञापत्र भरणे-** i) उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केलेनंतर त्याने प्रतिज्ञापत्र भरणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्र मराठी-इंग्लीश कोणत्याही भाषेत भरू शकतो.





प्रतिज्ञापत्र भरणे साठी Affidavit वर क्लिक करावे.

ii) तदनंतर उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्राचा क्रमांक सिलेक्ट करणे आवश्यक आहे. म्हणजेच नामनिर्देशनपत्र प्रथम भरणे आवश्यक आहे.




iii) नामनिर्देशनपत्र क्रमांक सिलेक्ट केलेनंतर खालील स्क्रिन येईल, प्रथम प्रतिज्ञापत्रातील सर्व मुद्दे भगव्या रंगाचे दिसतील व जसजशी माहिती भरली जाईल व जतन केली जाईल तसतसा प्रत्येक मुद्दा हिरवा होत जाईल.




iv) नामनिर्देशनपत्रात नमुद माहिती Auto-filled येईल.  उर्वरीत माहिती भरणे आवश्यक राहिल.


**a) Candidate Details-**




**b) Criminal Cognizance Details–** माहिती निरंक असल्यास दिलेल्या चौकोनात क्लिक करावे, अन्यथा सविस्तर माहिती भरावी.




प्रत्येक माहिती हि Add करून Save करणे आवश्यक आहे.




c) Criminal Convicted Details- उमेदवाराच्या गुन्हेगारी पार्श्वभुमीबद्दलची माहिती अत्यंत काळजीपुर्वक भरणे तसेच तपासणे आवश्यक आहे.




**d) Movable Property Details -**

उमेदवाराने स्वत:चे तसेच आपल्या पती/पत्नी व अवलंबीतांचे जंगम मालमत्ते भरणे आवश्यक आहेत. तसेच कोणताही रकाना रिकामा ठेवण्यात येवु नये. लागु नसणाऱ्या ठिकाणी NA/Nill तसेच 0 (जेथे आकडेवारी भरावयाची असेल तेथे) भरणे आवश्यक आहे.






Movable Property Details मध्ये Cash in Hands, Fixed & Saving Deposits, Shares & Debentures, NSC/Other Deposit Amount, Motor Vehicle , Jewelry, Life Insurance policy, machinery, Incurring amount, Investment, political income, All types of movable property, other borrowed movable property, other property details आहेत. All Columns have to be filled.


**e)Immovable Property Details-** उमेदवाराने स्वत:चे तसेच आपल्या पती/पत्नी व अवलंबीतांच्या स्थावर मालमत्तेबाबतचा तपशील येथे द्यावा.




**f) Loan & Liabilities -** उमेदवाराने स्वत:वर तसेच आपल्या पती/पत्नी व अवलंबीतांवर असणारे कर्ज वा ते भरत असलेल्या करां संबंधीचा तपशील येथे देणे अपेक्षीत आहे. कराबाबत मागील 3 वर्षांचा तपशील भरावा. लागु नसेल तिथे NA भरावे.









g) Educational Qualification- उमेदवाराचे जास्तीत जास्त शिक्षण जिथपर्यंत झाले आहे त्या महत्तम शैक्षणीक पदवीचा तपशिल येथे देणे अपेक्षीत आहे.




h) **Children Details** – उमेदवाराच्या मुलांबाबतची माहिती भरावी. तसेच १२ सप्टेंबर २००१ नंतर जन्मलेले मुल / मुले  असल्यास त्यांच्या जन्म दिनांकाचा तपशील येथे भरावा.





i) Income Details – उमेदवाराने स्वत:चे तसेच आपल्या पती/पत्नी व अवलंबीतांच्या एकुण उत्पन्नाचा तपशील येथे देणे अपेक्षीत आहे. जर PAN card नसेल तर NO म्हणावे, उमेदवाराचा व्यवसाय आपोआप येईल मात्र इतरांचा तपशील दयावा लागेल.







j) Contract Details- उमेदवाराने स्वत:चे तसेच आपल्या पती/पत्नी व अवलंबीतांच्या कोणत्याही स्वरूपाचे करार असल्यास त्याचे  तपशील येथे देणे अपेक्षीत आहे. लागु नसल्यास NO म्हणावे.





k) Foreign Investment Type- (Movable Property investment)- उमेदवाराच्या स्वत:च्या तसेच पती/पत्नी व अवलंबीतांच्या नावे परदेशात कोणत्याही स्वरूपाच्या जंगम मालमत्तेत गुंतवणूक असल्यास त्याचा तपशील येथे देणे अपेक्षीत आहे.




I) Candidate Case Details- उमेदवाराचे विरूद्ध सुरू असलेल्या दिवाणी दाव्याचा तपशील येथे भरणे आवश्यक आहे. जर उमेदवारावर कोणताही दिवाणी दावा नसेल तर तो डायरेक्ट टिक करू शकतो,





किंवा डिटेल्स भरू शकतो.




m) Foreign Investment Type- (Immovable Property investment)- उमेदवाराच्या स्वत:च्या तसेच पती/पत्नी व अवलंबीतांच्या नावे परदेशात कोणत्याही स्वरूपाच्या स्थावर  मालमत्तेत गुंतवणूक असल्यास  त्याचा तपशील येथे देणे अपेक्षीत आहे.




n) Previous Contested Elections- उमेदवाराने यापुर्वी जर निवडणूका लढविल्या असतील तर त्यांचा तपशील येथे भरणे आवश्यक आहे.



o) Constituency Development Plan- उमेदवाराच्या मतदारसंघाबाबतच्या विकास योजना त्यांनी येथे (३०० ते १५०० characters) मांडणे अपेक्षीत आहे.





p) Final Submission- After filling all details do the final submission.

## प्रकरण -४

## नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र -निवडणुक निर्णय अधिकाऱ्याने भरणे

**४.१ -** ज्यावेळी काही कारणस्तव आयोगाकडून शेवटच्या/वा चालु कार्यक्रमाच्या कोणत्याही दिवशी नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र Offline म्हणजेच संगणकप्रणालीतून न घेता हाती घेण्याबाबत सुचना देण्यात येतात त्यावेळी, अशी प्राप्त नामनिर्देशनपत्रे संगणक प्रणालीत समाविष्ट करून घेणेकरिता RO Login मधुन सदर नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र भरण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तरी अशी नामनिर्देशनपत्रे RO Login मधुन भरता येतात.



## प्रकरण -५

## नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र -निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करून घेणे

### ५.१- निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांच्या स्तरावर करावयाच्या संगणक प्रणाली विषयक कामाची तोंडओळख

आयोगाकडून देण्यात येणाऱ्या कार्यक्रमानुसार, प्रत्येक टप्यावर ज्यापदधतीने निवडणुक निर्णय अधिकारी कार्यवाही करतो त्याच पद्धतीने केलेलया कार्यवाहीची नोंद संगणक प्रणालीत करणे येथे अपेक्षीत आहे. उदा. नामनिर्देशनपत्रे उमेदवार जरी संगणक प्रणालीतुन भरत असले तरी त्याची प्रिंट काढून साक्षांकीत करून निवडणुक निर्णय अधिकारी यांना नियमाप्रमाणे स्वत: वा सुचकामार्फत सादर करतात. सदर प्राप्त नामनिर्देशनपत्रे दाखल करून घेणे, प्रत्यक्षात केलेल्या छाननी प्रमाणे त्याची नोंद संगणकप्रणालीत विहित मुदतीत होणे अपेक्षीत आहे.

त्यासाठी **निवडणुक निर्णय अधिकारी यांचेस्तरावर प्रत्येक २-३ प्रभागांसाठी किमान १ या प्रमाणे ऑपरेटर ची सोय करावी तसेच संगणक प्रणालीत वेळेवर (दररोज) नोंद घेण्याची जबाबदारी एका सक्षम अधिकाऱ्यावर सोपवावी.**




**५.१.२ –** निवडणुक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर करण्यासारखे ९ Transactions असून, जवळजवळ १२ मुख्य अहवाल/रिपोर्टस आहेत. तसेच नामनिर्देशनपत्र अहवालात आणखिन सविस्तर अहवाल आहेत. त्याचसोबत आयोगाकडून मागविण्यात येणाऱ्या विवीध अहवालांचे नमुने स्टेटमेंटस मध्ये आहेत.

विवीध टप्यावर ज्यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी संगणक प्रणालीत नोंद घेतो त्यावेळी त्याने संबधित अहवाल व प्रत्यक्ष परिस्थीती यांची पडताळणी करून पहाणे आवश्यक आहे म्हणजेच त्यामध्ये तफावत तर येत नाही ना याची खात्री करणे आवश्यक आहे.

उदा. निवडणुक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर एका प्रभागात १० नामनिर्देशनपत्र प्राप्त आहेत त्यापैकी ४ अवैध्य व ६ वैध्य आहेत त्यापैकी २ डुप्लीकेट आहेत तर एका उमेदवाराने माघार घेतली आहे अशा परिस्थीतीत सबमिशन, छाननी, माघार व अंतिम निवडणूक लढविणारे उमेदवार हे सर्व अहवाल प्रत्येक स्तरावर तपासून आपण योग्य नोंद घेत असल्याची खात्री करावी.


## ५.२ – नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र -निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करून घेणे-

५.२.१ निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडे प्राप्त नामनिर्देशनपत्र दाखल करून घेणेसाठी 'Nomination Submission' या मेनुवर क्लीक करावे.





प्रत्येक उमेदवारास त्याच्या लॉगइन मधून जास्तीत जास्त ४ फॅार्म भरता येतात. सबब उमेदवाराने त्यापैकी नेमका कोणता फॉर्म प्रत्यक्षात दाखल केला आहे हे तपासणे आवश्यक आहे.


५.२.२ 'Nomination Submission' या मेनुवर क्लीक केलेनंतर पुढिल स्क्रीन उपलब्ध होईल-




उमेदवाराच्या Registration No. प्रमाणे आपण १-१ नामनिर्देशनपत्र दाखल करून घेवु शकतो किंवा Advance Search मधून आपण संगणकप्रणालीत भरण्यात आलेले सर्व नामनिर्देशनपत्रे प्रभागनिहाय पाहून त्यामधून उमेदवाराने प्रत्यक्षात सादर केलेले नामनिर्देशनपत्र सिलेक्ट करून पुढिल कार्यवाहीसाठी दाखल करून घेवू शकतो. यासाठी आपणास Non-Submitted / Submitted असे २ Options दिसतील त्यापैकी कार्यवाहीसाठी प्रलंबीत अर्ज Non-Submitted ह्या Option मध्ये दिसतील.





५.२.३ प्राप्त यादीतुन प्रत्यक्षात प्राप्त अर्ज रेडीयो बटन द्वारे सिलेक्ट करुन Next म्हणावे.





अर्ज सिलेक्ट करताना अर्जावरील रजिस्टेशन नंबरशी त्याची जुळवणी करून तोच प्राप्त अर्ज असल्याची खात्री करावी.


५.२.४ – प्रत्यक्षात प्राप्त अर्ज व सिस्टीम मध्ये दिसणारा अर्ज यामधील माहिती एकच असल्याची खात्री करावी. कधी कधी उमेदवार नामनिर्देशनपत्रामधील काहि पाने बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी माहिती एकच असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जर तफावत निदर्शनास आल्यास उमेदवाराकडे त्याची चौकशी करावी. जर उमेदवाराने काहि खोडाखोड करून साक्षांकीत करून नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल उदा. प्रभाग क्रमांक , तर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची विहीत मुदत उलटून गेली नसल्यास उमेदवाराच्या लॉगइन मधून योग्य प्रभागातए योग्य नामनिर्देशनपत्र दाखल करून घ्यावे व तशी नोंद ठेवावी. जर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची विहीत मुदत उलटून गेली असल्यास RO Login मधुन सदर नामनिर्देशन पत्र भरून घ्यावे व तशी नोंद ठेवावी.



५.२.५-




नामनिर्देशनपत्र व सोबतच्या कागदपत्रानुसार List of Documents वरील रेडीयो बटण  क्लीक करत जावयाचे आहे मात्र **कोणतेही कागदपत्र Upload करावयाची नाहीत.** सर्व माहिती तपासले नंतर रेकॉर्ड Save करावा.तद्नंतर खालील प्रमाणे स्क्रीन येईल.




# प्रकरण –६


# नामनिर्देशन पत्र –छाननी करणे

## ६.१ – नामनिर्देशन पत्र छाननी व संगणकीकरण–


राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार विहीत दिनांकास प्रत्यक्षात झालेल्या छाननी नुसार वैध–अवैध नामनिर्देशनपत्राची नोंद संगणक प्रणालीत तात्काळ घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे टॅब आहे.





६.२ – नामनिर्देशनपत्र शोधणे




उमेदवाराच्या **Registration No.** प्रमाणे आपण १-१ नामनिर्देशनपत्र पाहुन छाननी करू शकता किंवा **Advance Search** मधून आपण संगणकप्रणालीत दाखल करण्यात आलेले सर्व नामनिर्देशनपत्रे प्रभागनिहाय पाहून त्यामधून उमेदवारानिहाय नामनिर्देशनपत्र छाननी करून पुढिल कार्यवाहीसाठी पाठवु शकता. ज्या नामनिर्देशनपत्राची छाननी (संगणकप्रणालीत) प्रलंबीत आहेत ती सर्व नामनिर्देशनपत्र आपणास **Pending** मध्ये दिसतील, तर संगणकप्रणालीत वैध ठरवण्यात आलेली नामनिर्देशनपत्रे **Accept** व संगणकप्रणालीत अवैध ठरवण्यात आलेली नामनिर्देशनपत्रे **Reject** ह्या Option मध्ये दिसतील.





६.२.२- **नामनिर्देशनपत्र तपासणे/ छाननी करणे-** रेडियो बटणवर क्लीक करून **"Next"** म्हंटले नंतर उमेदवाराने भरलेल्या नामनिर्देशनपत्रातील माहिती पुन्हा उपलब्ध होते.ती माहिती तपासुन प्रत्यक्षात सादर केलेल्या कागदपत्रानुसार प्राप्त कागदपत्रांची नोंद घेणे अपेक्षीत आहे. मात्र कुठेही कोणतेही कागदपत्र अपलोड करणे अपेक्षीत नाही.



State Election Commission - Google Chrome
Not secure | testsecgp.mahaonlinegov.in/ZPForms/NominationScrutinyViewZP.aspx
State Election Commission
Nomination Scrutiny ZP - Form
Here you get all details of candidate form including his and his proposer's voterlist details, party details, personal details


State Election Commission - Google Chrome
Not secure | testsecgp.mahaonlinegov.in/ZPForms/NominationScrutinyViewZP.aspx
After cross-checking detail's correctness as per actual physically received nomination you have to click 'Next'

६.२.३ छाननी दरम्यान वैधता अवैधता ही प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कार्यवाही प्रमाणे असेल, प्रत्यक्षात नामनिर्देशनपत्र वैध आहे पण संगणकप्रणालीत अवैध ठरवले वा प्रत्यक्षात नामनिर्देशनपत्र अवैध आहे पण संगणकप्रणालीत वैध ठरवले अशा चुका टाळाव्यात. तसेच या स्टेजवर सर्व नामनिर्देशनपत्रांची (दुबार सह) छाननी होणे अपेक्षीत आहे.





रेकॉर्ड सेव्ह केलेनंतर खालील स्क्रीन दिसेल.




## प्रकरण -७

## उमेदवारी माघे घेणे


**७.१- उमेदवारी माघे घेणे-** राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार विहीत दिनांकास प्रत्यक्षात घेण्यात आलेल्या माघारी नुसार उमेदवारी माघारीची नोंद संगणक प्रणालीत तात्काळ घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे टॅब आहे.




७.२ उमेदवाराच्या Registration No. प्रमाणे आपण १-१ उमेदवारानिहाय प्रक्रीया पुर्ण करू शकता किंवा Advance Search मधून आपण संगणकप्रणालीत वैध असणाऱ्या सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे प्रभागनिहाय पाहून त्यामधून उमेदवारानिहाय माघारीची कार्यवाही करू शकता. उमेदवार निहाय यादी आपणास Non-Withdrawal मध्ये दिसतील, तर संगणकप्रणालीत माघार घेतलेल्याची नोंद झालेल्या उमेदवारांची नावे (नामनिर्देशनपत्रे) Withdrawal मध्ये दिसतील.





७.३ Non-Withdrawal मध्ये दिसणाऱ्या नावांपैकी ज्या उमेदवाराने उमेदवारी मागे घेतली असेल अशा उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र (एकापेक्षा अधिक असल्यास एकएक करून सर्व) सिलेक्ट करावे. माघार घेतली वा कसे याबाबतची योग्य नोंद करावी, Next म्हंटलेनंतर Data Submitted Successfully असा संदेश येईल व रेकॉर्ड सेव्ह होईल. ज्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली नाही अशा उमेदवारांना डायरेक्ट चिन्ह वाटप करु शकतो.




# प्रकरण -८

## चिन्ह वाटप करणे


८.१ - ज्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली नाही अशा निवडणुक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप करणेसाठी खाली दर्शविलेल्या टॅब वर क्लीक करावे




८.२ उमेदवाराच्या Registration No. प्रमाणे आपण १-१ उमेदवारानिहाय प्रक्रीया पुर्ण करू शकता किंवा Advance Search मधून आपण संगणकप्रणालीत वैध असणाऱ्या व उमेदवारी मागे न घेतलेल्या सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे प्रभागनिहाय पाहून त्यामधून उमेदवारानिहाय चिन्ह वाटपाची कार्यवाही करू शकता. चिन्ह वाटपासाठी प्रलंबीत उमेदवार निहाय यादी आपणास Non-Alotted मध्ये दिसतील.



८.३




१) आपण Non-Alotted मध्ये दिसणाऱ्या उमेदवारासमोरील रेडियो बटण क्लीक केलेनंतर उमेदवाराचे नाव, रजिस्ट्रेशन नंबर सोबतच खालील प्रश्नावली दिसेल-

i) सदर उमेदवारास Independent/अपक्ष घोषित करावयाचा असल्यास ( जर सदर उमेदवाराने राजकीय पक्षाकडून नामनिर्देशनपत्र दाखल केले असल्यास परंतु त्यास नमुना A व B मिळाले नसेल तर)

ii) सदर उमेदवाराचा पक्ष बदलायचा असेल तर ( जर सदर उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल करताना राजकीय पक्षाचे नाव हाती खोडून इतर पक्षाकडून नामनिर्देशनपत्र दाखल केले असल्यास व त्या पक्षाचा नमुना A व B सादर केला असेल तर)

iii) वा सदर नामनिर्देशनपत्र Duplicate असेल तर

iv) तसेच उमेदवाराने पक्षाचा नमुना A व B सादर केला आहे वा कसे

तरी याबाबतची लागु असणारी माहिती येथे भरणे अपेक्षीत आहे.

*सदर माहिती अत्यंत काळजीपुर्वक व बिनचुक भरली जाईल याची सर्वस्वी जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असणार आहे. सबब माहिती भरताना प्रत्यक्षात घेण्यात आलेल्या निर्णयानुसारच ऑनलाईन चिन्ह वाटप झाले आहे हे तपासावे व अहवाल पाहून खात्री करावी*

**आपण प्रत्यक्षात केलेले चिन्हवाटप अहवाल व संगणकप्रणालीतील अहवाल जुळत असल्याची खात्री करून त्याची एक प्रत आयोगास पाठवावी*

*** एकदा चिन्ह वाटप केले नंतर उमेदवाराच्या पक्षात बदल करता येणार नाही

## प्रकरण -९
## उमेदवार बिनविरोध जाहिर करणे

९.१ – ज्यावेळी एखाद्या प्रभागात निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत केवळ एकच उमेदवार बाकी असेल अशावेळी राज्य निवडणूक आयोगाच्या रितसर परवांगी नंतर संबधित उमेदवारास **बिनविरोध जाहिर करणेकामी खालील** टॅबवर क्लीक करावे.





९.२ ज्या उमेदवाराला बिनविरोध जाहिर करावयाचे आहे, त्या उमेदवाराच्या राजकीय पक्षात बदल करणे वा अपक्ष जाहिर करणे अशा बाबी नसतील तर निवडणूक निर्णय अधिकारी चिन्ह वाटप न करताही बिनविरोध जाहिर करू शकतो.

मात्र जर असे बदल करावयाचे असले तर चिन्ह वाटप या टॅब वर जावुन सदर बदल केलेनंतरच बिनविरोध करणे अपेक्षीत आहे.

९.३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने उमेदवारास चिन्ह वाटप केले असल्यास Alloted मध्ये व चिन्ह वाटप केले नसल्यास Non- Alloted मध्ये उमेवाराचे नाव शोधून रेडियो बटणवर क्लीक करावे. सदर उमेदवार विजयी घोषित करावयाचा का ह्या प्रश्नास Yes म्हणून, रेडियो बटणवर क्लीक केल्यावर "Winner Declared Successfully" असा संदेश प्राप्त होईल.

*मात्र एकदा निकाल घेषित झालेनंतर कोणतेही बदल करता येणार नाहित*

९.३


testsecgp.mahaonlinegov.in says
Winner declared Successfully
OK
Candidate Details
If there is only one contesting candidate & if RO want to declare him Independent he has to click on Radio Button
& Submit
After Submission You will get above message.

# प्रकरण -१०

## मतदान केंद्र मास्टर

१०.१ **मतदान केंद्र मास्टर भरणे-** निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी अंतीम झाले नंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या स्तरावर **Polling Booth Master** भरणे अपेक्षीत आहे.





१०.२ Polling Booth Master किंवा मतदान केंद्रनिहाय माहिती १-१ करून भरू शकता किंवा एकदम EXCEL द्वारे अपलोड करू शकता.

१०.२.१ प्रभाग निहाय मतदान केंद्रांची संख्या, मतदान केंद्राध्यक्षांची माहिती, तसेच केंद्रनिहाय EVM ची माहिती (शक्य असल्यास) येथे देणे अपेक्षीत आहे. मात्र, **मतदान केंद्रनिहाय भरण्यात येणारी स्त्री-पुरूष-इतर व एकूण मतदार यांची संख्या अचूक असणे आवश्यक आहे. सदर संख्येवर पुढिल मतदानाच्या दिवशीची आकडेवारी तसेच मतमोजणीची आकडेवारी जुळवली जात असल्याने सदर आकडेवारी बिनचुक असणे आवश्यक आहे. तसेच सदरची माहिती मतदान सुरू होणेपुर्वी भरणे गरजेचे आहे.**


१०.२.२ Excel Upload Template –

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Electoral_Division_Number | Polling_Booth_Number | Polling_Booth_Address | Presiding_Officer_Name | Mobile_Number | EmailID | Police_Station_Incharge_Name | Mobile_Number_of_Police_Incharge |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| Voter_Male | Voter_Female | Voter_Other | Code_Number_of_BU_Alloted | Code_Number_of_BU_No_2 Alloted | Code_Number_of_CU_Alloted | Code_Number_of_DMM_Alloted | |

१०.२.१




१०.२.२





EXCEL Cannot be uploaded after Polling Started

## प्रकरण -११

## मतदानाची आकडेवारी भरणे विषयी

### ११.१ मतदानाच्या दिवशी दर २ तासांची आकडेवारी संगणकप्रणालीवर भरणे-


मतदानाच्या दिवशी, निवडणूक निर्णय अधिकारी दर २ तासांची मतदानकेंद्र निहाय आकडेवारी, दर २ तासातासांनी भरू शकतात किंवा एकाचवेळी संपूर्ण दिवसाची माहिती, दिवसा अखेर खात्री करून (confirmed) भरू शकतात.





११.२ दर २ तासांची मतदानकेंद्र निहाय आकडेवारी भरताना Polling Booth Master मध्ये भरण्यात आलेली एकुण मतदारांची माहिती हि Auto-Filled येते, सबब त्यातील मतदारांच्या संख्येपेक्षा अधिक माहिती संगणक प्रणालीत स्विकारली जाणार नाही हि बाब लक्षात घेवून मतदान केंद्राची माहिती भरताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे.

**तसेच ५.५० वा.ची (मतदानाची अंतीम आकडेवारी) आकडेवारी हि खात्री करूनच (confirmed) भरणे आवश्यक आहे. कारण सदर आकडेवारी हि मतमोजणीचा डेटा भरताना विचारात घेतली जाईल.**


**तरी मतदान केंद्र मास्टर, मतदानाची आकडेवारी व मतमोजणी हि Interlinked माहिती असल्याने सदर माहिती काळजीपुर्वक भरावी.**




११.२.१  ज्यावेळी मतदान केंद्राची माहिती व मतदानाच्या दिवसाची आकडेवारी जुळणार नाही त्यावेळी खालील प्रमाणे माहिती भरताना अडचण येईल.



११.२.२ Polling Data Boothwise (All Time)





* All Time माहिती भरताना आपण ड्राफ्ट सेव्ह करू शकता तसेच यात बदल करू शकता मात्र एकदा Final Submission केलेनंतर यात बदल करता येत नाही.

** मतदानाची आकडेवारी ही चढत्या क्रमाने (progressive) भरणे आवश्यक आहे.


# प्रकरण –१२

## मतमोजणी व प्रमाणपत्र देणे


**१२.१ मतमोजणीचा डेटा भरणे–** प्रत्यक्षात प्रभागाचा निकाल जाहिर झालेनंतर तात्काळ डेटा भरण्यास सुरवात करण्यात यावी. सदरची आकडेवारी हि अंतीम आकडेवारी असणार आहेत. सदरचा टॅब खालील प्रमाणे आहे.




१२.२.१ – मतमोजणीच्या टॅबवर क्लीक केलेनंतर प्रभागाची मतदार संख्या व प्रत्यक्षात झालेल्या मतदानाची आकडेवारी व इतर माहिती ऑटो फील येईल.




१२.२.२ मतमोजणी मध्ये EVM किंवा मतपत्रीकेदवारे देण्यात आलेली मते व टपाली मते यांची उमेदवार निहाय स्वतंत्र नोंद घेण्याची सुविधा आहे.





**उमेदवाराला मिळालेल्या मतांची माहिती भरताना Edit या बटणावर क्लीक करून माहिती भरावी व Update करावे. Update न केल्यास माहिती जतन होत नाही.**


१२.२.३ EVM किंवा मतपत्रीकेदवारे देण्यात आलेली मते हि प्रत्यक्ष झालेल्या मतदाना पेक्षा जास्त असणार नाहित तसेच EVM किंवा मतपत्रीकेदवारे देण्यात आलेली मते + टपाली मते ही प्रभागाच्या एकुण मतदारांच्या संख्येपेक्षा जास्त असणार नाहित. तसे करण्याचा प्रयत्न केल्यास माहिती जतन करता येणार नाही.





**१२.३ सर्वाधिक मते मिळवणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित करणे-** निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतमोजणीची माहिती अत्यंत काळजीपुर्वक भरणे गरजेचे आहेच त्याचबरोबर सर्वाधिक मते मिळवणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित करतानाही योग्य पर्यायावर क्लीक करणे आवश्यक आहे.



१२.४ .१ विजयी उमेदवारास प्रमाणपत्र देणे-




१२.४.२ 'Certificate' या पर्यायावर क्लीक केलेनंतर खालील स्क्रीन दिसेल.




१२.४.३ सदर स्क्रिनवरील Download या पर्यायावर क्लीक केले नंतर खालील  प्रमाणे प्रमाणपत्र तयार होईल.




# प्रकरण –१३
## निवडणूक निकाल पहाणे

**१३.१ निवडणूक निकाल पहाणे –** राज्य निवडणुक आयोगाच्या ऑफिशीयल वेबसाईटवर (https://mahasec.maharashtra.gov.in/) निवडणूक निर्णय अधिकारी संगणकप्रणाली मध्ये भरत असलेले (https://panchayatelection.maharashtra.gov.in/ ) निकाल दिसण्याची सोय करण्यात आलेली आहे. सबब प्रभागनिहाय निकाल तयार होवून घोशीत होताच तो तात्काळ संगणक प्रणालीत भरण्यासाठी आवश्यक सुविधा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावी.







१०.२.१ राज्य निवडणुक आयोगाच्या ऑफिशीयल वेबसाईटवर Election Result या चौकोनावर क्लीक केलेनंतर आपण ३ प्रकारे लागलेला निकाल पाहू शकतो


1) Elected Candidates

2) Constituency wise Election Result


3)Political Party wise Result



Elected Candidates- जिंकलेल्या उमेदवारांची नावे (प्रभागनिहाय ) पाहू शकता.




Constituencywise Result- प्रभागनिहाय निकाल (सर्व उमेदवारांचा) येथे पाहू शकता.



Political Partywise Result- राजकिय पक्षनिहाय मिळालेल्या मतांची संख्या येथे पाहू शकता

